# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १६९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.०३ जुलै २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## देवेंद्र फडणवीसांची आदित्य ठाकरे, अमित ठाकरेंवर टीका

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेचे नेते अमित ठाकरे यांच्या बॉम्बे स्कॉटिश शाळेचा संदर्भ देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निशाणा साधला आहे. मुलांना बॉम्बे स्कॉटिश स्कूलमध्ये शिकवायचं आणि भारतीय भाषांना विरोध करायचा, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेप्रमुख राज ठाकरे यांचा समाचार घेतला. ठाकरे बंधूंचा भारतीय भाषांना विरोध, मात्र इंग्रजीला पायघड्या, असा हल्लाबोल देखील देवेंद्र फडणवीसांनी केला. पहिलीपासून हिंदी शिकवण्याबाबतचे जीआर मागे घेतल्यानंतर, ठाकरे बंधूंनी विजयी मेळाव्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. तसंच सरकारच्या समितीला न जुमानण्याची भाषा दोन्ही ठाकरेंनी केली. मात्र कुणाच्याही दबावाला बळी न पडता सरकारी समिती जो निर्णय देईल तो घेणारच अशी भूमिका देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केली आहे. रवींद्र चव्हाणांची भाजप प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाली. या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी मराठी आणि हिंदीच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधूंवर जोरदार घणाघात केला. त्रिभाषा सूत्राचा निर्णय उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच घेतला गेला, याचा देवेंद्र फडणवीसांनी पुनरूच्चार केला.

# शक्तीपीठ महामार्गासाठी २० हजार कोटी तर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सरकारकडे पैसे नाहीत का?

### विरोधकांचा संतप्त सवाल, विधिमंडळात गोंधळ; विरोधक राजकारण करत असल्याचा अजित पवारांचा आरोप

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शेतकरी कर्ज माफीचा मुद्दा चांगलाच गाजला. या प्रश्नावर विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी या विषयावर स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र, अध्यक्षांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. इतकेच नाही तर विरोधक शेतकऱ्यांच्या आडून राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला आहे.



सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी २० हजार कोटी मंजूर करते. पण शेतकरी कर्जमाफी साठी सरकारकडे पैसे नाहीत का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. त्याला सत्ताधारी पक्षानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. शेतकऱ्यांच्या आडून विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी देखील काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले होते. माजी मंत्री बबनराव ल ोणीकर यांच्या वक्तव्यावरुन कृषिमंत्री आणि लोणीकर यांनी माफी मागण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यासाठी त्यांनी थेट राजदंडला स्पर्श केल्याने अध्यक्षांनी त्यांना एका दिवसासाठी निलंबित केले होते. त्यानंतर आता दुसऱ्या दिवशी वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव मांडत शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा करण्याची मागणी केली होती. हा प्रस्ताव अध्यक्षांनी स्विकारला नाही.

राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या काल ावधीत ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदत ही सरकार देत नसल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करतात आणि त्यांचा अपमान करतात. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही, कापसाला भाव मिळालेले नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या (पान ४ वर)

## शक्तीपीठ महामार्ग विरोधात आंदोलन करणाऱ्या राजू शेट्टी यांच्यासह ४०० जणांवर गुन्हे दाखल

कोल्हापूर/सांगली दि.२ (प्रतिनिधी)- राज्यातील महायुती सरकारचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या नागपूर ते गोवा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात मंगळवारी राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला. यात मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी थेट रस्त्यावर उतरून या महामार्गाला कडाडून विरोध दर्शवला. अशातच कोल्हापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग सुमारे दीड तास रोखून सरकारला सज्जड इशारा दिला. कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतल्याने आता सरकारची चांगलीच कोंडी होणार असल्याची चिन्हे असताना या प्रकरणाला आता वेगळं वळण लागलं आहे. शक्तीपीठ महामार्ग विरोधात आंदोलन केल्या प्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह ४०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, बंदीचे आदेश असताना जमाव एकत्र करून महामार्ग रोखल्याचा ठपका ठेवत राजू शेट्टी यांच्यासह ४०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यात राजू शेट्टी यांच्यासह माजी आमदार ऋतुराज पाटील, माजी आमदार राजू बाबा आवळे, शिवसेनेचे नेते विजय देवणे यांच्यासह ४०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. कोल्हापूरच्या शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात हे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, आंदोलनापूर्वी राजू शेट्टी यांच्या शिरोळ इथल्या घरी कोल्हापूर पोलीस पोहोचले होते. यावेळी शक्तीपीठ महामार्ग विरोधात चक्काजाम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांना नोटीस देखील बजावण्यात आली होती. अशातच बंदीचे आदेश असतानाही जमाव एकत्र करून महामार्ग रोखल्याचा ठपका ठेवत हा गुन्हा दाखल करण्यात आल ा आहे.

सांगलीचे अपक्ष खासदार विशाल पाटील यांनी देखील रस्त्यावर उतरुन शक्तिपीठ महामार्गास विरोध केला. त्यामुळे, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याचा ठपका (पान ४ वर)

## उद्धव ठाकरेंच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात १६ जुलैला सुनावणी

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- भारतीय निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना जाहीर केले आणि त्यांना 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह देण्याचा निर्णय दिला होता. दरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून या निर्णयाला आव्हान देत अंतरिम दिल ासा मिळावा अशी मागणी करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दखाल करण्यात आली आहे. या ठाकरे गटाकडून दाखल केलेल्या याचिकेनंतर हे प्रकरण १६ जुलै रोजी सुचिबद्ध करण्याचे बुधवारी (२ जुलै) रोजी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे.

उद्धव ठाकरे यांच्या गटाची बाजू मांडणारे वरिष्ठ वकिल देवदत्त कामत यांनी न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या अंशिक कामकाज दिवसांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण उपस्थित केले आणि या आठवड्यात किंवा पुढील आठवड्यात तातडीने यावर सुनावणी घेण्याची मागणी केली.

मात्र (पान ४ वर)

## पंढरीच्या वारीत अर्बन नक्षलवादी शिरले

### शिंदे गटाच्या आमदार मनिषा कायंदे यांच्या वक्तव्याने नवा वाद होण्याची चिन्हे

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- जगभरात ज्याला प्रसिद्धी मिळते अशी ऐतिहासिक पंढरपूरची वारी आहे. या वारीसाठी लाखो वारकरी पंढरीला रवाना झाले आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो दिंड्या पंढरपूरकडे रवाना झाल्या आहेत, सर्वसामान्य कार्यकर्ते भाविक वारीत जात असतात. मात्र, असं असताना एक नवीनच प्रकार समोर आला आहे, काही अर्बन नक्षलवादी वारीत शिरले आहेत, ही ऐकीव माहिती नसून सबळ पुरावे समोर आले आहेत, असे शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे यावेळी सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते. आता, आमदार कायंदे यांच्या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. आता, आमदार आदित्य ठाकरे यांनी या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे.

देवाला धर्माला ही लोकं मानत नाही, हा त्यांचा अधिकार आहे. हिंदू धर्म आणि वारीबद्दल अपप्रचार करत आहेत, लोकांचा बुद्धीभेद करत आहेत. पंढरपूरची वारी अशी आहे जिथे कोणी कोणाला



निमंत्रण देत नाही. वेगवेगळ्या बोगस नावाखाली काही संघटना जसे पर्यावरण दिंडी, संविधान दिंडीसारख्या गोष्टी समोर आल्या आहेतस, पथनाट्य करतात, असे शो करतात. एक दिवस तरी वारी अनुभवा, हा माणूस कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे. सासवड येथे ही लोकं पोहोचतात आणि त्यांच्या वारीचा रुट देखील आहे. क्युआर कोड त्यांनी दिलाय जो ब्लॅकलिस्टेड आहे, असं दिसतंय. पंढरपूरच्या वारीचा ही लोकं गैरफायदा घेत आहेत, अशी माहिती मनीषा कायंदे यांनी सभागृहात दिली.

वारीत अनेक महिला वारकरी आपण पाहातो, तुळशीचं रोप घेऊन काही महिला चालतात. इतर कोणत्या गोष्टींचा प्रचार प्रसार करायचा असेल तर त्यांचा उपयोग करू शकता. काही वारकरी संघटना मुख्यमंत्र्यांना (पान ४ वर)

## महायुतीत निधीवाटपावरुन खडाजंगी

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- महायुतीमध्ये निधीवाटपाच्या मुद्यावरून अधून मधून खडाजंगी होत असल्याची चर्चा असताना हा वाद तिन्ही पक्षातील आमदार आणि मंत्र्यांनी वेळो वेळी पक्षश्रेष्ठींकडे बोलून दाखवला आहे. अशातच आता शिवसेना मंत्र्यांची निधीवाटपावरून महत्वाची बैठक झाली आहे. शिवसेना पक्षातील मंत्र्यांच्या झालेल्या बैठकित तीनही पक्षातील आमदारांना समसमान निधी देण्यावर एकमत झाले आहे. निधीवाटपावरून तीनही पक्षातील नाराजी टाळण्यासाठी शिवसेना मंत्र्यांमध्ये समसमान निधीचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, लवकरच याबाबत तीनही पक्षातील प्रमुख नेते किंवा समन्वय समितीच्या बैठकीत याबाबत अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, निधीवरून भाजप आमदार विनोद अग्रवाल आणि संजय पूरम यांनी मंत्री भरत गोगावलेंची वाट अडवत जाब विचारला. निधीवरून मंत्री आणि आमदारांमध्ये होणारी ही खडाजंगी रोखण्यासाठी महायुतीतील समन्वय समितीत किंवा तीनही प्रमुख पक्षांच्या नेत्यांमध्ये अधिवेशन काळात महत्वाची बैठक होणार असल्याचीही माहिती सूत्रांनी दिली आहे.

## नॅशनल हेराल्ड प्रकरणी सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्याविरोधात ईडीचा गंभीर आरोप

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- अंमलबजावणी संचालनालयाने बुधवारी दिल्लीतील एका न्यायाल यात सांगितले की, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राचे प्रकाशक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या २ हजार कोटींच्या मालमत्तेची मालकी केवळ ५० लाख रुपये देऊन मिळवली आहे.

अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू म्हणाले की, 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडकडे दिल्ली, लखनऊ, भोपाळ, इंदूर, पंचकुला, पाटणा आणि इतर ठिकाणी माल मत्ता आहेत आणि या सर्व मालमत्ता केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारांनी १९४७ नंतर वृत्तपत्र छपाई आणि प्रकाशनासाठी दिल्या आहेत. पण, असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड ताब्यात घेतल्यानंतर लगेचच यंग इंडियन (गांधींच्या नियंत्रणाखालील संस्था) ने घोषित केले की, ते नॅशनल हेराल्डसह कोणत्याही वृत्तपत्र प्रकाशनात सहभागी होणार नाहीत. २००० कोटी रुपयांची संपूर्ण कंपनी ताब्यात घेण्यासाठी त्यांनी फक्त ५० लाख रुपये दिले.'

दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाचे विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांच्यासमोर हे निवेदन सादर करण्यात आले आहे. दरम्यान, नॅशनल हेराल्ड मनी (पान ४ वर)

## अपाचे लढाऊ हेलिकॉप्टर्सची पहिली तुकडी लवकरच भारतात

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- ऑपरेशन सिंदूरनंतर, भारत सातत्याने पश्चिम सीमेवर आपली लष्करी ताकद आणि लढाऊ क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करत असताना, अपाचे लढाऊ हेलिकॉप्टरच्या पहिल्या तुकडीची दीर्घ प्रतीक्षा संपली आहे. १५ महिन्यांहून अधिक विलंबानंतर, पश्चिम सीमेवर तैनात करण्यात येणाऱ्या अपाचे लढाऊ हेलिकॉप्टरची डिलिव्हरी लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. आर्मी एव्हिएशन कॉर्प्सने मार्च २०२४ मध्ये जोधपूरमध्ये पहिले अपाचे स्क्वाड्रन उभारले होते, परंतु उभारणीच्या जवळजवळ १५ महिन्यांनंतरही, स्क्वाड्रन अपाचे लढाऊ हेलिकॉप्टरशिवाय आहे. अमेरिकेकडून अपाचे एएच-६४ई लढाऊ हेलिकॉप्टरची डिलिव्हरी अनेक वेळा पुढे ढकलण्यात आली आहे. २०२० मध्ये अमेरिकेसोबत (पान ४ वर)

## अनिल परब लिंबू मिरची घेऊन विधान परिषदेत दाखल

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- रायगडच्या पालकमंत्री पदाचा वाद सुरू असतानाचा शिंदे गटाचे आमदार आणि राज्याचे मंत्री भरत गोगावले यांच्यावर अघोरी पूजा केल्याचा आरोप झाला होता. याचे पडसाद आज विधान परिषदेत उमटले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब हे सभागृहात चक्क 'लिंबू-मिरची' घेऊन पोहोचले. रायगडमध्ये तंत्र-मंत्राच्या माध्यमातून होणाऱ्या संभाव्य धोक्यांपासून आदिती तटकरे यांचे संरक्षण व्हावे, अशी भावना अनिल परब यांनी व्यक्त केली. त्यांच्या या कृतीमुळे सभागृहात चांगल ाच हास्यकल्लोळ बघायला मिळाला.

रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. शिंदे गटाचे नेते भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे दोघेही आग्रही आहेत. त्यामुळे रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद कायम आहे. या दरम्यान काही दिवसांपूर्वी भरत गोगावले यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यातून अघोरी पूजा केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. गोगावले यांनी या आरोपांचे खंडन केले होते. मात्र, याचे पडसाद पावसाळी अधिवेशात पाहायला मिळाले. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब हे आज चक्क लिंबू-मिरची घेऊन विधान परिषदेच्या सभागृहात दाखल झाले.

आपण गेल्या महिन्यांमध्ये वेगवेगळे कायदे करुन वेगवेगळ्या पद्धतीने सुरक्षा (पान ४ वर)

## अल्पवयीन विद्यार्थ्याशी शारीरिक संबंध ठेवणाऱ्या शिक्षिकेला अटक

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राजधानी मुंबईतील एका नामांकित इंग्रजी शाळेतील शिक्षिकेला अल्पवयीन विद्यार्थ्याशी शारिरिक संबंध ठेवल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असून शिक्षिकेने विद्यार्थ्याचे अनेकवेळा लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याशिवाय, ती शिक्षिका विद्यार्थ्याला दारू पाजायची, आणि पंचतारांकित हॉटेलमध्ये घेऊन जायची. या हॉटेल मध्येच याचे लैंगिक शोषण करायची, अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, महिला शिक्षिकेडून एका १६ वर्षीय विद्यार्थ्यावर १ वर्षापेक्षा अधिक काळ लैंगिक अत्याचार सुरू होता. विद्यार्थ्याच्या कुटुंबीयास मुलाच्या वागण्यातील बदल दिसून आल्यानंतर त्याच्याकडे विचारणा केली असता ही धक्कादायक बाब समोर आली. मुलाने आपल्या आई-वडिलांसमोर लैंगिक अत्याचाराबद्दलची माहिती (पान ४ वर)

## गडचिरोलीत स्टील हब होणार; जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक विधानसभेत मंजूर

नागपूर दि.२ (प्रतिनिधी)- गडचिरोली जिल्ह्याला वेगाने स्टील हब म्हणून विकसित करण्यासाठी तसेच गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख आणि औद्योगिक गौण खनिजांच्या व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्याचे अध्यादेश विधेयक बुधवारी विधानसभेत मांडण्यात आल े. ते चर्चेनंतर मंजूर करण्यात आले. या निर्णयाला यापूर्वीच मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. त्या नंतर २ जून २०२५ रोजी अध्यादेश काढण्यात आला. त्याचे विधेयकात रूपांतर करण्यासाठी राज्याचे पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई यांनी ते विधानसभेत मांडले.

खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई स्टील हब म्हणून विकास करण्यासाठी प्राधिकरण असल्याचे सांगितले. कारण जवळपास ७ मोठे उद्योजक १ हजार कोटी ६० लाखांची गुंतवणूक करण्यासाठी तयार आहे. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून स्थानिकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याची योजना तयार आहे असे सांगितले. खनिजांनी समृद्ध असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात खाणकामांना गती देण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल उचलत, महाराष्ट्र सरकारने गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरणाची स्थापना केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, ही १६ सदस्यीय संस्था प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे, खाण भाडे पट्ट्यांची अंमलबजावणी जलद करणे आणि जिल्ह्याचा वेगाने 'स्टील सिटी' म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

लोहखनिज, हेमॅटाइट, मॅग्नेटाइट, चुनखडी, डोल ोमाइट आणि कोळशाचे मोठे साठे असलेले गडचिरोली औद्योगिक प्रगतीसाठी सज्ज आहे. या उपक्रमामुळे राज्याचे उत्पन्न वाढेल, स्थानिक रोजगार निर्माण होईल आणि तीन वर्षांत हा प्रदेश 'नक्षलमुक्त' होण्यास हातभार लागेल अशी अपेक्षा आहे, असे देसाई यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीचा हात पकडून 'आय लव्ह यु' म्हणणे लैंगिक अत्याचार नाही

### उच्च न्यायालयाचे महत्वपूर्ण निरीक्षण

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- एखाद्या अल्पवयीन मुलीचा हात पकडून तिला आय लव्ह यू म्हणणे म्हणजे लैंगिक अत्याचार होत नाही असं महत्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोंदवलं. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या एकल खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवलं या प्रकरणी दाखल करण्यात आलेली याचिका रद्द करत न्यायालयाने एका २७ वर्षाच्या व्यक्तीला निर्दोष मुक्त केलं.

ही घटना नागपूरमधील असून ऑक्टोबर २०१७ मध्ये घडली. एक १७ वर्षांची मुलगी कॉलेजमधून तिच्या घरी जात असताना एक मुलगा (त्यावेळी त्याचे वयही १७ वर्षे होते) तिच्याजवळ आला. त्या मुलाने मुलीचा हात पकडल ा आणि तिला आय लव्ह यू असं म्हटलं. त्या मुलीने या संदर्भात पोलिसामध्ये तक्रार केली. मुलीच्या तक्रारीवरून त्या मुलाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. सत्र न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करून त्या मुलाला कलम ३५४ए (लैंगिक अत्याचार) आणि ३५४डी (पान ४ वर)

# ‘एसटी’सुद्धा खासगीकरणाकडे ?

गेल्या काही वर्षांत एसटी महामंडळ आर्थिक संकटात सापडले. गेल्या ४५ वर्षांत फक्त ८ वेळाच एसटी नफ्यात होती. एसटीच्या आर्थिक कोंडीला बेकायदा वाहतूक कारणीभूत ठरली असून संचित तोटा १० हजार ३२२.३२ कोटींवर गेल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. राज्यातील खेड्या-पाड्यात, गावागावांतून विहार करणारी आपल्या सर्वांची लाडकी लाल परी गेल्या काही वर्षांपासून आर्थिक कोंडीत सापडली आहे. एसटी महामंडळाची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत असून बेकायदा वाहतूक एसटीच्या तोट्यास मुख्य कारण ठरले आहे. एसटी गाड्यांची कमतरता, तोट्यातील मार्गावर गाड्या चावलणे, विशेष म्हणजे तिकीट दरात वाढ करण्यात येणारी अडचण यामुळे एसटी महामंडळाला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. एसटी महामंडळाची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पीएफ, ग्रॅज्युटी या पोटी ३ हजार ५०० कोटी रुपये कर्मचाऱ्यांना देणे आहे. एसटी महामंडळ आर्थिक संकटात सापडली आहे. त्याचप्रमाणे एसटीच्या गाड्यांच्या संख्येत घट होत असून २०११-१२ साली १८,२७५ बसेस होत्या. मात्र २०२४-२५ पर्यंत बसेसची संख्या घसरून १५,७६४ वर आली आहे. त्यात खासगी ट्रॅव्हल्सची घुसखोरी एसटी महामंडळासाठी डोकेदुखी ठरत आहे. सन २०१८-१९ मध्ये एसटीचा संचित तोटा सुमारे ४६०० कोटी होता; परंतु कोरोना महामारीच्या काळात लॉकडाऊनमुळे व नंतर चाललेल्या कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन संपामुळे तो संचित तोटा आता १०,३२२.३२ कोटींवर पोहोचला आहे. कर्मचाऱ्यांचे देणे सुमारे ३ हजार कोटींपर्यंत आहेत. शासनाने अनुदान स्वरूपात एसटी महामंडळाला मदत करणे अत्यंत आवश्यक असून एसटीची आर्थिक गाडी रुळावर आणणे खूप आवश्यक बनले आहे. गेली अनेक वर्षे सातत्याने तोट्यात असलेल्या एसटी महामंडळाला येत्या ४ वर्षांत फायद्यात आणण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही परिवहन मंत्र्यांनी दिली आहे.

राज्यातील तब्बल ९० टक्के लोकसंख्येला थेट परिवहन सेवा देणारी एसटी ही महाराष्ट्राची ‘लोक वाहिनी’ आहे. दररोज सुमारे ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित दळणवळण सेवा देणारी एसटी भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे, ही काळाची गरज आहे. एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील संस्थेचा आर्थिक तोटा कमी करण्यासाठी आपल्या कामाची उत्पादकता वाढवणे आणि योग्य ठिकाणी काटकसर करून बचत करणे आवश्यक आहे. दरवर्षी ५ हजार नवीन बस आपल्या ताफ्यात समावेश तसेच उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडे तत्त्वावर घेणार असून महामंडळाच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारणार आहे. एसटी महामंडळाच्या आगारांचा विकास केला जाणार असून सी-कॅटेगरी मार्गांचे बी-कॅटेगरीत व बी-कॅटेगरीचे ए-कॅटेगरीत रूपांतर करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावला जाणार असून खर्च कमी करण्यासाठी ५ हजार एलएनजी आणि १ हजार सीएनजी बसेसचा समावेश केला जाणार आहे. १९८१-८२ मध्ये ७९,४५८ कर्मचारी संख्या होती. १९९१-९२ मध्ये १,१२,२०० इतकी झाली; मात्र अलीकडे ८६,३१७ इतकीच राहिली आहे. कमी मनुष्यबळातून आर्थिक उन्नती साधली जाणे हे कर्मचाऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. एसटी महामंडळास शासनाचा आर्थिक आधार मिळाला असून २००१ ते २०२४ दरम्यान शासनाकडून ६,३५३.८० कोटींची भांडवली मदत मिळाली. कोविड काळात आणि संपाच्या पार्श्वभूमीवर ४,७०८.७३ कोटी अनुदान दिले गेले. गेल्या चार वर्षांत ९,९२२.७८ कोटींचे अनुदान मिळाले आहे. असे असले तरी एसटी महामंडळाची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत असून इंधनाचा खर्च, गाड्यांचे सुटे भाग खरेदी करणे, भाडेतत्त्वावरील बसेसचा खर्च, टोल अशा विविध गोष्टींवर वर्षांला कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. त्यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असून दर महिन्याला कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर देणे शक्य होत नाही. त्यामुळे एसटी महामंडळातील तब्बल ८६ हजार ३१७ कर्मचाऱ्यांना पगारासाठी दर महिना प्रतीक्षा

करावी लागते. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी राज्य सरकारने अनुदान उपलब्ध करून द्यावे लागेल, तरच कर्मचाऱ्यांना पगार देणे शक्य होणार आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात एसटीची सेवा असून प्रवाशांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्याची जबाबदारी वाहक व चालक पार पाडतात, तर प्रशासकीय कामकाज हाताळणारे कर्मचारी आपली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडतात. मात्र कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मात्र आजही कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न कायम आहे. महामंडळाची गाडी नफ्यात धावली तरच कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार देणे शक्य होईल, नाही तर सरकारकडे वारंवार हात पसरण्याची वेळ येणार आहे. आजच्या घडीला कर्मचाऱ्यांची ७ हजार कोटींची देणी थकली आहेत. आर्थिक श्वेतपत्रिकेत पीएफ ग्रॅज्युटीचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र महागाई भत्ता, वेतनाचा फरक, घर भाडे याचा उल्लेख श्वेतपत्रिकेत करण्यात आलेला नाही. समस्या भरपूर आहेत. मात्र कर्मचाऱ्यांवर भरोसा ठेवला तर यातूनही मार्ग निघू शकेल. मात्र खासगीकरण नको असाच सध्या कर्मचाऱ्यांचा सूर आहे.

गेल्या आठवड्यात एसटी महामंडळाच्या आर्थिक संकटाची श्वेतपत्रिका जाहीर करण्यात आली. आता यावर उपाय म्हणून फायद्यात येण्यासाठी एसटी महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी हायटेक व्होल्व्हो बसेसचा समावेश करण्यात येणार आहे. एसटीच्या जागा म्हणजेच बस स्थानके व बस आगारे यांचा विकास केला जाणार आहे. खर्चात कपात करण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी आता सांगितले आहे. म्हणजेच दुसऱ्या पावलांनी एसटी महामंडळाचे खासगीकरण तर सुरू होणार नाही ना अशी भीती आता कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# ब्रह्मवृंद वैभव वधू-वर तर्फे छत्रपती संभाजीनगर येथे ६ जुलै रोजी वधू - वर थेटभेट मेळावा

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी)- ब्रह्मवृंद वैभव वधू-वर तर्फे छत्रपती संभाजीनगर येथे ६ जुलै रोजी वधू - वर थेटभेट मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार ६ जुलै रोजी सकाळी हॉटेल नहुष येथे होणाऱ्या ब्राह्मण वधू-वर थेटभेट मेळाव्यामध्ये प्रथम वधू, वर, घटस्फोटीत, विधवा, विधुर आणि दिव्यांग सहभागी होणार आहेत.

या थेटभेट मेळाव्यात वधू, वर यांची उपस्थिती अनिवार्य आहे. त्यांचे सोबत एका पालकास उपस्थित राहता येईल. या मेळाव्यासाठी १ जुलैपर्यंत नावनोंदणी करता येणार असल्याची माहिती श्री. दत्तात्रय पिंपळे ९४०३९२२८६२ यांनी दिली. थेटभेटा मेळाव्यात जास्तीत जास्त वधू वर आणि त्यांच्या पालकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जुन्या भांड्यांची नावे, पूर्ण विसरण्याआधी...

**भारतीय** ‘पाक’ पुराणातील वैविध्य आपण आपल्या जन्मापासूनच अनुभवीत आलो आहोत. स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंमध्ये कालानुरूप फरक पडला. तरीही अगदी आज सुद्धा खेड्यांमध्ये गरज म्हणून आणि शहरांमध्ये फॅशन, स्टाईल म्हणून या वस्तू वापरल्या जातात. पण आता बदलाचा वेग इतका अधिक आहे की या वस्तू हळूहळू वस्तू संग्रहालयांची वाटचाल करीत आहेत. बहुतेक सर्व जुन्या वस्तू संग्रहालयांमध्ये स्वयंपाकाच्या भांड्यांचे एक वेगळे दालन आढळून येते. साहजिकच याचा विशेष अभ्यास केला जातो. पुस्तके, लेख प्रसिद्ध केले जातात. गुजरात मधील अहमदाबाद येथील विचार भांडी संग्रहालयात सुमारे ४५०० जुन्या भांड्यांचा संग्रह केला गेला आहे. अशा प्रकारचे हे जगातील सर्वात मोठे संग्रहालय आहे. पुण्यातील राजा केळकर तसेच झपूर्झा या वस्तुसंग्रहालयांमध्ये अशा कित्येक दुर्मिळ वस्तूंचा मोठा संग्रह आढळतो.

स्थानिक बोलीभाषा, परंपरा यानुसार एकाच भांड्याचे, वस्तूचे अनेक आकार प्रकार, उपयोग आढळतात. त्यांची नावेही वेगळी आढळतात. याचे प्रमाणीकरण आणि दस्तावेजीकरण झालेले नाही. गुजराती भाषेमध्ये ‘पात्र शब्दावली’ या नावाचा शब्दकोश असून त्यात अशा भांड्यांचा वस्तूंचा, विभागीय नावे आणि चित्रे यासह परिचय दिला आहे. याच दिशेने एक प्रयत्न म्हणून मी महाराष्ट्र परंपरेतील कांही प्रचलित भांड्यांची नावे, संदर्भ, फोटो, उपयोग यांची एक यादी / तक्ता सोबत देत आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे यातील कांही नावे आणि वस्तू महाराष्ट्रातच वेगळ्या नावाने, आकाराने प्रचलित आहेत. म्हणूनच हा प्रयत्न आहे.

**१) कळशी** – मंदिराच्या कळसाशी साम्य, काखेत धरून यातून दुरून पाणी आणतांना ते सांडू नये म्हणून तोंड छोटे असते. या कळशांच्या संख्येवरून कांही पोटजातींची नावे पडली आहेत.

**२) घागर** – ‘ काखेत कळशी, डोईवर हंडा ख त्यावरी गुंडा, वरती घागर II ‘ असे पाणी आणणे आणि साठविण्याच्या भांड्यांचे चार प्रकार. कळशीपेक्षा घागर वेगळी. मोठ्या तोंडाची, डोक्यावर ठेवता येईल अशी. यात घाट, आकार आणि निर्मितीचे ठिकाण यावरून विविध प्रकार आहेत. राजापुरी, कोल्हापुरी, नाशिक, सोलापुरी इ.

**२ अ ) हंडा** – पाणी आणणे आणि साठविणे यासाठी उपयोग. ग्रामीण संस्कृतीत हे सर्व पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी रोज वापरले जात असल्याने यांचा मराठी साहित्यात अनेक ठिकाणी उल्लेख येतो.

**३) गुंडा** – वरील भांड्यांशी साधर्म्य असलेले मोठे भांडे. याला हंड्यासारखे काठ नसत. यातील छोट्या आकाराचा गुंडा, हंड्यावर ठेवला जात असे. मोठ्या गुंड्यात अधिक पाणी मावत असल्याने तो खूप जड होतो. त्यामुळे तो ने - आण या साठी न वापरता जमिनीवर ठेवून साठवणीसाठी वापरला जातो.

**४) पातेले** –– स्वयंपाकासाठी प्रामुख्याने वापरले जाणारे गोल आकाराचे काठाचे भांडे ! याचा तळ फुगीर, थोडा बाकदार असतो. याला भगुलं असेही म्हटले जाई.

**५) सतेले** – पातेल्यासारखेच पण तळ सपाट असलेले ‘सतल’ भांडे. सपाट तळाच्या अन्य भांड्यांनाही सतेले म्हटले जाते. हे भांडे जमिनीवर स्थिर राहते. हल्ली विजेच्या इंडक्शन चुलींवर अशीच भांडी वापरावी लागतात.

६) तपेले –– तळाशी पसरट आणि तोंडाशी अरुंद असलेले हे भांडे पाणी आणायला, तापवायला, अन्न शिजवायला वापरले जाते.

७) तांब्या –– पाणी वापरासाठी तात्पुरते साठविणे यासाठी प्रामुख्याने हे गोल भांडे वापरले जाते. तांबे या धातूपासून बनविले जात असल्याने याचेच नाव तांब्या असे झाले. जेवणात आणि धार्मिक विधींमध्ये, आंघोळीसाठी याचा अजूनही वापर होतो. हिंदीत याला लोटा म्हटले जाते.

**८) तपेली** –– तपेल्याचीच छोटी आवृत्ती



म्हणजे तपेली. पाण्याच्या पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी ( हातपाय धुणे, आंघोळ इ.) तपेली वापरली जाते.

**९) गडू** –– छोट्या गळ्याचे हे छोटे गोल भांडे. लग्नाचे देवक ठेवतांना यावर लाडू ठेऊन ते स्थापित केले जाते. ‘ ’ग’ ळ्यावर लाडू, तो गडू ‘ असे म्हणत. लहान मुलांना पाणी, दूध पिण्यासाठी याचे आकर्षण वाटत असे. यालाच चंबू असेही म्हटले जात असे.

**१०) चंबू** –– तळाशी गोल गरगरीत आणि लांब तोंड असलेले हे एक वेगळे भांडे. पिण्याच्या पाण्यासाठी, देवाच्या अभिषेकाला घेऊन जाण्यासाठी वापरतात. ‘ तोंडाचा चंबू करणे ‘ म्हणजे गाल फुगवून दोन्ही ओठांची चोच करणे. याच्या अरुंद व लांब तोंडामुळे याला आतून कल्हई करता येत नसे. म्हणून हा जर्मन सिल्व्हरचा बनविला जात असे. पारशी सम ाजात जर्मन सिल्व्हरच्या अनेक वस्तू वापरल्या जातात. त्यामुळे याला पारसी लोटा असेही म्हणतात.

**११) ताकाची कथली** – कल्हई न लावलेल्या भांड्यात जर आंबट पदार्थ ठेवले तर ते कळकतात, खूप वेगळ्या चवीचे लागतात,अपायकारकही ठरतात. ताक हा पूर्ण आम्लधर्मी पदार्थ असल्याने तो ठेवण्यासाठी कथिल म्हणजे टिन ( रासायनिक संज्ञा डप ) या धातूपासून बनविलेला तांब्या वापरला जात असे. धातूच्या नावावरून यालाच कथली असे म्हणत असत.

**१२) कासंडी** – हे मोठ्या तोंडाचे एक छोटे भांडे आहे. गाई, म्हशी, बकऱ्या यांचे दूध काढण्यासाठी हे वापरतात. आचळामधून दूध काढताना त्याची धार भांड्यामध्ये योग्यपणे पडेल अशा तऱ्हेने याचे तोंड बनविलेले असते. एका हाताने दूध काढताना दुसऱ्या हाताने हे भांडे आचळांच्या जवळ धरून ठेवतात. यात दूध थोडे साठले की ते जड होते. म्हणून त्यातील दूध जवळच ठेवलेल्या मोठ्या भांड्यात ओतून लगेचच हे पुढे वापरणे सुरू राहते. कांसे या धातूची हंडी म्हणून किंवा कांसेतून थेट दूध काढण्यासाठी म्हणून ही ‘कासंडी ’!

**१३) घंगाळे** – आंघोळीला, हातपाय धुवायला पाणी काढून ठेवण्याचे पसरट भांडे. हे प्रामुख्याने तांबे या धातूचे बनविलेले असे. दोन्ही बाजूंना ( उचलण्यासाठी ) कड्या असत. स्नान करतांना हे गंगेचे पवित्र जल आहे अशा श्रद्धेने, तसे मंत्र, श्लोक म्हटले जात असत. ‘ गंगा आलय ’ म्हणून गंगालय = गंगाळे = घंगाळे.

१४) बालदी –– आंघोळ, कपडे धुणे, विहिरीतून पाणी काढणे, पाण्याच्या बहुविध वापरासाठी उपलब्ध साधन. आपल्याकडे कित्येक वर्षे वापरात असलेली बालदी ही बाहेरून आलेली आहे. सुमारे ६००० वर्षांपूर्वीच्या बॅबिलोनियन लेण्यांमध्ये फॅरोह नार्मरच्या सेवकांच्या हातात बालदीचे दर्शन घडते. गोल तळापासून तोंडापर्यंत वाढत गेलेला आकार, दोन बाजूंना दोन कान, त्यात अडकवलेली अर्धगोल कडी असलेली बालदी बहुपयोगी आहे. कांही ठिकाणी याला बादली म्हणतात पण शब्दकोशानुसार हा शब्द बालदी असून त्याचे हिंदीकरण बाल्टी असे होते.

**१५) द्रोणी** – एकसंध काळ्या दगडातून कोरलेले द्रोणाच्या आकाराचे, पाणी साठवणुकीचे मोठे भांडे. आंघोळ, कपडे किंवा भांडी धुणे, गुरांना पाणी पाजणे इत्यादींसाठी वापर आणि पूर्णतः पर्यावरण स्नेही ! द्रोण या शब्दाचा अपभ्रंश होऊन डोणी, डोण असेही याला म्हटले जाते.

**१६) पिंप** –– धातूच्या पत्र्याच्या सिलिंडरला तळ आणि झाकण असलेले एक बहुपयोगी साधन. पाणी साठविण्यासाठी सर्वाधिक वापर केला जातो. ही वस्तूदेखील विदेशातून आपल्याकडे अवतरलेली आहे. याला टाकी, टंकी, टाके असेही म्हणतात.

**१७) मशेरे** –– गावच्या घरांच्या पडवीत, अंगणात, शेतात पाणी गरम करण्यासाठी एक चूल आणि त्यावर एक वर्षानुवर्षे जळल्याने बाहेरून काजळी, मशेरी धरलेले मोठे भांडे ठेवलेले असते. या चुलीत लाकडांव्यतिरिक्त पालापाचोळा, काड्या, वेली इत्यादींचा सरपण म्हणून वापर होतो. त्यामुळे खूप धूर होतो. अन्य भांड्यांप्रमाणे हे रोज न घासता तसेच ठेवलेले असते. मशेरीमुळे कायमचे काळे पडलेल्या या भांड्याला मशेरे असे म्हणतात.

**१८) उटणटवळे** – तळाशी संपूर्ण गोलाकार असलेले हे भांडे सपाट जागेवर स्थिर राहत नाही. खाली ठेवल्यावरही ते बराच वेळ डुगडुगत राहते. यावरून ज्या माणसाचे मन, विचार, बूड स्थिर नसते त्यांना उटणटवळा किंवा उटणटवळी म्हणतात.

१९) शकुंतला, इंदुमती, अनुसूया भांडी एका कारागिराने एक भांडे बनविले आणि त्या भांड्याला त्याच्या दोन बायकांपैकी एका बायकोचे म्हणजे शकुंतलेचे नाव दिले.

आपल्या सवतीचे नाव दिल्यामुळे त्याची दुसरी बायको खूप चिडली. म्हणून त्याने आणखी एक थोड्या वेगळ्या प्रकारचे भांडे बनवून त्याला अनुसूया भांडे असे नाव दिले. आता समोरच्या तांबट कारागिराची पत्नी चिडली. ‘समोरचा तांबट आपल्या दोन्हीही बायकांच्या नावांची भांडी बनवितो आणि माझ्या नवऱ्याची मी एकुलती एक असूनही तो माझ्या नावाचे कांहीच बनवीत नाही. ‘तिने याबद्दल तिच्या नवऱ्याला जाब विचारल्यावर त्याने बिचाऱ्याने एक थोडे वेगळे भांडे बनवून त्याला आपल्या बायकोचे म्हणजे इंदुमती भांडे असे नाव दिले. आता हा किस्सा खरा की खोटा यापेक्षा या किश्शयामुळे ही तिन्ही भांडी तरी लक्षात राहतात हे महत्वाचे ! तूप किंवा दूध वाढायला आजही अनेक ठिकाणी, ही भांडी वापरली जातात. यांच्या कमी उंची व पसरट तळामुळे ती पटकन कलंडत नाहीत*.

**२०) लंगडी** – कमी उंचीचे व पसरट मोठ्या तळाचे हे भांडे एकाचवेळी पदार्थाच्या मोठ्या हिश्शाला उष्णता पुरविते. भाजणे, परतणे यासाठी प्रामुख्याने वापरले जाते.

**२१) तसराळे** – पदार्थ काढून ठेवणे, वाढण्यासाठी नेणे, पीठ मळणे, मिसळणे अशा काम ांसाठी वापरले जाणारे पसरट भांडे.

**२२) कढई** – कुठल्याही तळण्यासाठी मूलभूत आणि अत्यावश्यक भांडे. पसरट आणि खोलगट, दोन बाजूंना कान असलेले खूप जुने परंपरागत अस्तित्व.

**२३) परात** – पीठ मळण्यासाठी प्रामुख्याने वापरात असलेले हे पसरट, थोड्या उंच काठांचे, ताटाच्या आकाराचे हे भांडे आहे. वस्तू निवडणे, वाळत ठेवण्यापासून ते बोडणासारख्या धार्मिक विधींपर्यंत बहुविध उपयोग !

**२४) काथवट** – भाकरीचे पीठ मळण्यासाठी खास वापरली जाणारी ही लाकडी परात आहे. ही एका अखंड लाकडातून कोरली जाते. यामध्ये दोन बाजूंना कान, कासवाच्या किंवा वृक्षाच्या पानाच्या आकाराची काथवट पाहायला मिळते. काष्ठवत या संस्कृत किंवा काठवती ( पुत्रवती, सौभाग्यवती तशी काठ असलेली काठवती ) या शब्दाशी काथवट किंवा काटवट शब्दाचा संबंध असावा.

**२५) कुंडा** – मातीच्या कुंडीच्या आकाराचे धातूचे छोटे भांडे. लहानसहान खाद्य पदार्थ ठेवण्यासाठी योग्य. पूर्वी अशा प्रकारात वाटी, वाडगा, सट, द्रोण, टाटली, दगडी इत्यादी अनेक प्रकार होते. आता बाउल्स या एकाच शब्दाने सर्वांना गिळून टाकले आहे.

**२६) चरवी** – दूध ठेवण्याचे धातूचे भांडे. पूर्वी यामध्ये गोल, उभट आकाराचे, झाकण असलेले, कडी असलेले असे अनेक प्रकार दिसत असत. पण आता दुधाचा रतीब घालणाऱ्यांकडे उंच, घट्ट मोठ्या झाकणाचे, मजबूत कडी असलेले भांडे पाहायला मिळते.

**२७) डेग / डेगची**– यालाच हंडी, देगची असेही म्हणतात. पसरट कमी उंचीचे, तळाशी रुंद, मानेशी अरुंद आणि काठाशी पुन्हा रुंद असे हे तांब्याचे भांडे. पुलाव, बिर्याणी, कांही मसालेदार भाज्या यांचे स्वाद, सुगंध पदार्थातच जिरविण्याच्या ‘दम पुख्त ‘ पद्धतीत हे भांडे योग्य ठरते. हे मोगलाई शैलीतून अवतरले असावे.

**२८) गंज / टोप** – अन्नपदार्थ काढून ठेवणे, ताक - सार - कढीसारखे पदार्थ वाढण्यासाठी, फुलपात्राच्या आकाराचे मोठे उंच भांडे. ब्रिटिश सैनिकांच्या टोपीसारखे दिसते म्हणून याला टोप असेही म्हटले जात असे.

**– मकरंद करंदीकर**

# जनता पार्टी आणीबाणीनंतर...

**इंदिरा** गांधींनी २५ जून १९७५ ते मार्च १९७७ या काळात देशावर लादलेल्या आणीबाणीत तब्बल एकवीस महिने विरोधी पक्षांचे दिग्गज नेते व लक्षावधी प्रमुख कार्यकर्ते जेलमध्ये होते. याच काळात इंदिरा गांधींना सत्तेवरून हटविण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन निवडणुका लढवल्या पाहिजेत यावर सर्व नेत्यांमध्ये मतैक्य झाले. वेगवेगळ्या विचारसरणीचे आणि वेगवेगळा अजेंडा असणारे राजकीय पक्ष आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढविण्यासाठी एकत्र आले. काँग्रेसचा पराभव करणे हे एकमेव उद्दिष्ट विरोधी पक्षांकडे होते. त्यातूनच लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या आशीर्वादातून जनता पार्टीचा उदय झाला. आणीबाणीनंतर झालेल्या १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि केंद्रात जनता पार्टीचे सरकार स्थापन झाले. मोरारजी देसाई यांनी बिगर काँग्रेसचे पहिले पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, पण चार मोठे राजकीय पक्ष एकत्र येऊन स्थापन झालेल्या जनता पार्टीचे सरकार फार काळ टिकले नाही. सतत हेवे-दावे, आरोप-प्रत्यारोप, समाजवादी विरुद्ध जनसंघ अशा संघर्षानेच जनता पार्टीचा घात केला. जनसंघाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवायचे नाहीत, यासाठी समाजवादी हट्टाला पेटली होती, तर आमची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आम्ही कदापि दूर करू शकत नाही, अशी ठाम भूमिका जनसंघाची होती. याच वादातून जनता पार्टीला मोठे तडे गेले.

जनता पार्टी सरकारला केंद्रात पाच वर्षांची टर्मही पूर्ण करता आली नाही आणि १९८० मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा सत्ताही मि ळवता आली नाही. काँग्रेसला पर्याय म्हणून निम र्ण झालेल्या जनता पार्टीचे व नंतर जनता दलाचे पुढे अनेक तुकडे पडले. स्वातंत्र्यानंतर वर्षानुवर्षे केंद्रात व विविध राज्यांत काँग्रेसची सत्ता होती. आणीबाणीपूर्वीही काँग्रेसच्या विरोधात विरोधी पक्षांनी एकत्र येऊन निवडणूक लढविण्याचा प्रयोग केला होता. ओल्ड काँग्रेस (काँग्रेसमधील फुटीर गट), भारतीय जनसंघ, स्वतंत्र पार्टी, समाजवादी पार्टी यांनी १९७१ मध्येही काँग्रेसच्या विरोधात एकत्र येण्याचा प्रयत्न केला होता. पण काँग्रेसच वरचढ ठरली. उत्तर प्रदेशात १९७४ च्या विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या विरोधात संयुक्त आघाडी करून निवडणूक लढवली. पण काँग्रेसचे एच. एन. बहुगुणांनी पुन्हा सत्ता प्राप्त केली. मात्र गुजरातमध्ये विविध विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनमोर्चा स्थापन केला व १९७५च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून दाखवला. त्यावेळी गुजरातमध्ये विद्यार्थ्यांचे नवनिम ाण आंदोलन तीव्र होते. या आंदोलनाचा लाभ जनमोर्चाला मिळाला. गुजरातमध्ये विरोधी पक्षाला मिळालेल्या यशानंतर बिहारमध्ये हाच प्रयोग केला गेला. आणीबाणीनंतर गुजरातमधील जनमोर्चाच्या मॉडेलचा आधार आणि जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वातून प्रेरणा घेऊनच जनता पार्टीचा उदय झाला. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वावर जनतेचा मोठा विश्वास होताच, पण त्यांच्यातील नैतिक सामर्थ्यानेच जनता पार्टीला मोठा जनाधार प्राप्त झाला. दरम्यान अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींवर सत्तेचा गैरवापर करून निवडणूक लढविल्याचा ठपका ठेवला, त्यांना दोषी ठरवले व त्यांची खासदार म्हणून झालेली निवड रद्द केली. या निकालानंतर इंदिराजी आता काय डावपेच लढवणार याची विरोधी पक्षाला मोठी उत्सुकता होती. न्यायालयाच्या निकालानंतर भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ, ओल्ड काँग्रेस व समाजवादी पार्टीच्या प्रमुख नेत्यांची दिल्लीत बैठक झाली. विरोधी पक्षांनी एकत्र येऊन एकच मोठा पक्ष स्थापन करावा असे चरणसिंग यांना वाटत होते, तर जनसंघाच्या नेत्यांना पक्षांचे विलीनीकरण मान्य नव्हते. गुजरात मॉडेल जनमोर्चा प्रमाणेच राष्ट्रीय पातळीवर आघाडी स्थापन करावी अशी भूमिका मोरारजी देसाई यांनी मांडली. समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी मात्र राजकीय पक्षांचे विलीनीकरण झाले तरी वेगवेगळ्या विचारधारांचे विलीनीकरण कसे होणार, असा प्रश्न उपस्थित केला. भारतीय लोकदल, जनसंघ, ओल्ड काँग्रेस, स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशलिस्ट पार्टी, उत्कल काँग्रेस या पक्षांनी एकत्र येऊन जनता पार्टीची स्थापना केली. शेतकरी नेते चरणसिंग यांनी ऑगस्ट १९७४ मध्ये त्यांचा पक्ष भारतीय क्रांती दल, स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशलिस्ट पार्टी व उत्कल काँग्रेस या चार पक्षांच्या विलीनीकरणानंतर भारतीय लोकदलाची स्थापना केली.

स्वतंत्र पक्षाची स्थापना सी. राजगोपालचारी यांनी केली होती. संयुक्त सोशलिस्ट पार्टीचे नेते म्हणून राम मनोहर लोहिया ओळखले जायचे. उत्कल काँग्रेसचे नेते बिजू पटनाईक होते. काँग्रेस पक्षात १९६९ मध्ये फूट पडल्यावर काँग्रेस ओल्ड व काँग्रेस आर असे दोन गट झाले. काँग्रेस आरचे नेतृत्व जरी जगजीवन राम यांच्याकडे असले तरी त्या पक्षावर संपूर्ण नियंत्रण इंदिरा गांधींचे होते. काँग्रेस ओल्डचे नेतृत्व एस. निजलिंगप्पा यांच्याकडे होते. काँग्रेस ओल्डमध्ये जुने व स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतलेले नेते होते. पंडित नेहरूंनंतर मोरारजी देसाई पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले होते, पण इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्याने मोरारजी होऊ शकले नाहीत. पुढे इंदिरा गांधींच्या सरकारमध्ये उपपंतप्रधान म्हणून काम करावे लागले. भारतीय जनसंघाची स्थापना १९५१ मध्ये झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची राजकीय आघाडी म्हणून जनसंघाची ओळख होती. ज्यावेळी जनसंघ जनता पार्टीत विलिन झाली तेव्हा लालकृष्ण अडवाणी हे पक्षाचे प्रमुख होते. जनसंघाचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आहे म्हणून समाजवाद्यांचा मोठा आक्षेप होता. सोशलिस्ट पार्टीचे नेतृत्व जॉर्ज फर्नांडिस यांच्याकडे होते. सोशलिस्ट पक्षात अनेक वेळा फूट पडली. १९७७ मध्ये निवडणुका जाहीर झाल्यानंतर काँग्रेस फॉर डेमॉक्रसी हा काँग्रेसमधील फुटिरांनी स्थापन केला. आणीबाणीचा फटका काँग्रेसमधील काही बड्या नेत्यांनाही बसला. या काळात एच. एन. बहुगुणा (उत्तर प्रदेश), नंदिनी सत्पथी (ओडिसा) यांना पक्षाने मुख्यमंत्रीपदावरून हटवले. त्यांनीच काँग्रेस फॉर डेमॉक्रसीची स्थापना केली व तो गट जनता पार्टीत सामील झाला. तेव्हा जनता पार्टीचे नेतृत्व ८१ वर्षांच्या मोरारजी देसाईकडे होते. जनता पार्टीने १९७७ ची लोकसभा निवडणूक लढवली पण निवडणूक आयोगाकडे नोंदणीचे उपचार पूर्ण न झाल्यामुळे जनता पार्टीला भारतीय लोकदलाच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवावी लागली. तसेच जनता पार्टीने तामिळनाडूत ओल्ड काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवली. जनता पार्टीने लोकसभेच्या ५४२ पैकी २९८ जागा जिंकल्या. भारतीय जनसंघाचे सर्वाधिक म्हणजे ९३ मतदारसंघांत खासदार निवडून आले. भारतीय लोकदलाचे ७१, ओल्ड काँग्रेसचे ५१, सोशलिस्ट पार्टीचे २८, काँग्रेस फॉर डेमॉक्रसीचे २८ खासदार निवडून आले. २४ मार्च १९७७ रोजी मोरारजी देसाई यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. जनता पार्टीच्या सरकारमध्ये चरणसिंग हे केंद्रीय गृहमंत्री होते. पंतप्रधानपद मिळाले नाही म्हणून ते नाराज होते. त्यातून सत्ताधारी पक्षात ताणतणाव वाढत गेला. १ जुलै १९७८ रोजी मोरारजी देसाई यांनी चरणसिंग यांना सरकारमधून हटवले. पण एक महिन्यानंतर चरणसिंग हे उपपंतप्रधान म्हणून परतले. तरीही चरणसिंग हे समाधानी नव्हते. १६ जुलै १९७९ रोजी राजीनामा देऊन सरकारमधून ते बाहेर पडले आणि जनता दल सेक्युलर नावाचा नवीन पक्ष स्थापन केला. पुढे काही दिवसांतच काँग्रेस पक्षाचा पाठिंबा घेऊन ते पंतप्रधान झाले. त्यांचे सरकार महिनाभरही टिकले नाही, विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाण्याअगोदरच त्यांनी राजीनामा दिला. जनता पार्टीचे सरकार स्थापन होऊन वर्षही झाले नसताना समाजवादी नेते मधू लिमये यांनी जनसंघावर दुहेरी सदस्याचा आरोप करून त्याला आक्षेप घेतला.

दि. २ सप्टेंबर १९७९ रोजी जनता पार्टीची राष्ट्रीय कार्यकारिणी झाली. त्यात दुहेरी सदस्यत्वावर चर्चा झाली. निवडून आलेल्या आमदार-खासदारांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात भाग घेण्यास मनाई करावी, असे चंद्रशेखर यांनी संघाच्या नेत्यांना सुचवले. दि. १९ मार्च १९८० रोजी जनता पार्टीच्या संसदीय मंडळाची बैठक झाली व पदाधिकाऱ्यांनी संघाच्या कार्यक्रमात सहभागी होऊ नये, असा निर्णय घेतला. केवळ पंधरा दिवसांनंतरच, दि. ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनसंघाने पक्षाचे अध्यक्ष म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाची घोषणा केली.

आपलाच पक्ष खरी जनता पार्टी आहे, असा दावाही जनसंघाने निवडणूक आयोगाकडे केला. पुरावा म्हणून आपल्या पक्षाच्या खासदारांच्या नावाची यादी जोडली.

दि. २४ एप्रिल रोजी या पक्षाला निवडणूक आयोगाने राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली व पुढे भारतीय जनता पक्ष उदयाला आला. मार्च १९८० मध्ये जनता पार्टी (एस)चे चरणसिंग यांनी आपल्या पक्षाचे नामकरण लोकदल करावे अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली, पण इंदिरा गांधींचा निवडणुकीत पराभव करणारे दिग्गज नेते राज नारायण यांनी त्याला आक्षेप घेतला. निवडणूक आयोगाने जनता पार्टी एस (चरणसिंग) व जनता पार्टी एस (राजनारायण) असा तोडगा दिला. कालांतराने चरणसिंग यांनी आपल्या पक्षाचे नामकरण लोकदल केले. जनता पार्टीचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी दि. २९ एप्रिल १९८० रोजी पक्षाला राष्ट्रीय मान्यता मिळावी म्हणून सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, पण दुसऱ्याच दिवशी निवडणूक आयोगाने त्यांच्या मागणीला होकार दर्शवला. १९८० मध्ये जनता पार्टी सेक्युलर पक्ष

लोकदलात विलिन झाला. नंतर लोकदल हा जनता दलात विलिन झाला. १९८९-९१ या काळात जनता दलाचे केंद्रात सरकार राहिले. नंतर जनता पार्टीप्रमाणेच जनता दलाचे तुकडे पडले. सोशलिस्ट समता पार्टी, समाजवादी जनता पार्टी (राष्ट्रीय), राष्ट्रीय जनता दल, बिजू जनता दल, राष्ट्रीय लोकदल, जनता दल युनायटेड, जनता दल सेक्युलर असे अनेक तुकडे पडले.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# सौर कृषी पंपाच्या समस्या, मोबाईलवरून तक्रारीची सुविधा

छत्रपती संभाजीनगर : राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळिवणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळिवणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे.

सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल.

शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

# पायी पंढरी पालखींचे रिंगण



**महाराष्ट्र** ही संत,महंत, व थोर समाज सुधारकांची भूमी आहे. त्यांचा हजारो वर्षांपासूनचा वारसा आजही चालू आहे.त्यांची शिकवण, त्यांची नैतिक मूल्ये,त्यांचे सकारात्मक प्रवचन,कीर्तन, वारी,दिंडी,पालखी आजही हा वारसा जपणारी मंडळी अत्यंत प्रामाणिकपणे जपत आहेत.

याचाच एक भाग म्हणून आषाढी एकादशी हा अत्यंत पावित्र्य व मंगलमय उत्सव विठ्ठलाच्या पंढरपूरात सामाजिक समता,एकता, बंधुभाव, व अध्यात्माचे अनोखे दर्शन घडविणारा उत्सव होय. पंढरीच्या विठ्ठल -पांडुरंग चरणी लीन होऊन महाराष्ट्र राज्याला,देशाला व जगाला सुख ,शांती, समृद्धी, आरोग्य लाभण्यासाठी व बळीराजा सुखावण्या साठी भरपूर पाऊस पडावा म्हणून प्रार्थना करणारा वारकरी संप्रदाय एक महिना आधी राज्यातील ठिकठिकाणच्या देव,संत यांच्यानावे पायी पालख्या विठ्ठल,पांडुरंग, तुकाराम, ज्ञानोबा, नामदेव, माऊली यांची भजन गात, टाळ, मृदंग, पताका, पाऊली खेळत पंढरीकडे आषाढीला पोहचतात. ऊन,वारा, पाऊस अंगावर झेलत,व दऱ्या ,खोरे, जंगल,चढ,उतार सर्व पार करीत ही दिंडी पंढरीकडे कूच करते.

या दिंड्याची वैशिष्ट्ये म्हणजे पालखीतील विविध रिंगण होत. पालखीतील विविध प्रकारची रिंगणे ही गावोगावच्या भक्त भाविकांचे मोठे आकर्षण ठरत आहेत.गोल रिंगण, उभे रिंगण, अश्वरिंगण, मेंढ्याचे रिंगण मना भावते.या विविध रिंगणातून शिस्त, शांतता, प्राणी प्रामाणिकता,त्यांचे धावणे,त्यांची शिस्त मन आकर्षित करते, पालखी भोवती वारकरी, अंतर सोडून पुन्हा वारकरी व मधल्या मोकळ्या जागेवरून शिस्तबद्धत धावणे, चालणे, प्राण्यांची शिस्त बद्धता सर्व, सर्व मना भावते, वारकरी, टाळकरी, गावकरी यांच्या विठ्ठल नामाच्या गजरात हा रिंगण सोहळा सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा असतो.या रिंगण सोहळ्यातून एकतेचे,समतेचे, ध्यान केंद्रीकरणाचे,व विठ्ठल, पांडुरंग, ज्ञानोबा, तुकाराम, नामदेव, यांच्या नामस्मरणाने मिळणाऱ्या प्रेरणा व ऊर्जेचे सुंदर दर्शन होते.रिंगण सोहळा बघण्यासाठी हजारो, लाखोंच्या संख्येने भक्त-भाविक जमून या रिंगण सोहळ्याचा आनंद घेतात.

**- धोंडीरामसिंह ध राजपूत.**

# संजय मुळे राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित



मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - दिनांक २९: लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांना आदर्श मानून जनसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या छत्रपती संभाजी नगरच्या संजय मधुकर मुळे यांना राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दिक्षा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वासराव तरटे, मानवतावादी चळवळीच्या प्रमुख अंतिमा कोल्हापूरकर इतर पुरस्कार प्राप्त मान्यवर उपस्थित होते.

काल राजर्षी शाहू स्मारक भवन, मिनी सभागृह, कोल्हापूर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यापूर्वी संजय मुळे यांना लोकमाता अहिल्यामाई होळकर सन्मान पुरस्कार, द एक्सलंसी आयकॉनिक अवॉर्ड आणि फाव अँण्ड फेअर्स यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या 'बेस्ट स्पीच अँण्ड स्पीकर ऑफ द इयर', महाराष्ट्र भूषण जीवन गौरव, उद्योगश्री जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांच्याकडून नॅशनल इंडस्ट्रीयल एक्सलंस पुरस्कार, क्वालिटी ब्रॅण्ड टाईम्स तर्फे क्वालिटी ब्रँड इंडिया पुरस्कार, एज्युकेशन ॲण्ड ह्युमन रिसर्च डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन तर्फे राष्ट्रीय निर्माण रत्न पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कार अशा विविध पुरस्कारांचे ही ते मानकरी राहिले आहेत.

# महानगरपालिकेची धडक अबेट मोहीम

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी)- धडक अबेट मोहीमेचा दुसरा टप्पा दि.०१/०७/२०२५ ते ०७/०७/२०२५ पर्यत आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या मार्गदर्शनानुसार व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत आहे.

दि. ०२/०७/२०२५ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा यांच्या हस्ते झोन क्र ०९ येथील धडक अबेट मोहीमेचे शुभारंभ संत एकनाथ रंगमंदिर येथुन करण्यात आला. याप्रंसगी डॉ पारस मंडलेचा यांनी सर्व अतिजोखमीच्या विभागात अबेटिंग तसेच एमएलओ ऑईलचा छिडकाव पावसामुळे साठलेल्या डबक्यांमध्ये टाकणे, हस्तपत्रिका वाटप, स्टिकर्स वाटप, याद्वारे जनजागृती करण्याच्या सुचना दिल्यात डॉ अर्चना राणे, डॉ संकलेचा, डॉ भामरे, डॉ स्नेहा नरवडे, डॉ अश्विनी सिंगु, डॉ आदित्यकुमार जोशी व इंचार्ज सिस्टर श्रीमती ज्योती अमोलिक, श्रीमती शुभांगी भोपळे, आशावर्कर सुपरवाईझर सुनिता नवगिरे, वंदना लोधवाल आरोग्य केंद्र पीरबाजार, बन्सीलालनगर, कबीरनगर, क्रांती चौक येथील एमपीडब्ल्यु, आशावर्कर्स मलेरिया विभागाचे पर्यवेक्षक चुन्नीलाल उदणे, अन्वर शेख, रत्नाकर साबळे, उमाकांत गायकवाड व मलेरिया कर्मचारी उपस्थित होते. दि.०१/०७/२०२५ रोजी मोहीमेची सुरुवात झोन क्र ०२ जिल्हा परिषद मैदान औरंगपुरा येथे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.अर्चना राणे यांच्या हस्ते रिबिन कापून करण्यात आले. दि.०१/०७/२०२५ रोजी झोन क्र ०२ मधील सुराणानगर, कैलाश नगर, संजयनगर, झोन क्र ६ मधील विठठलनगर, कामगारकॉलनी, चिकलठाणा व झोन क्र १० मधील कांचनवाडी, नक्षत्रवाडी, मोदीनगर हया भागामध्ये कर्मचाऱ्याद्वारे सर्वेक्षण व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात आल्या.

दि. ०१/०७/२०२५ रोजी १७६ मलेरिया व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत एकुण ९१७० घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी एकुण ६१८२५ कंटेनर्स तपासण्यात आले. त्यापैकी २१६ कंटेनर्स मध्ये डास अळया आढळून आल्या. यानुसार १४६ कंटेनर्स रिकामे करण्यात आले. आज एकुण ९४७९ घरांमधील पाण्यात अबेट टाकण्यात आले. २३९४ घरांमध्ये किटकनाशक औषध फवारणी करण्यात आली.१०५१ हस्तपत्रिका वाटप करण्यात आले. ६०३ ठिकाणी स्टीकर्स लावण्यात आले.

# मोठ्या प्रमाणात तिकीट तपासणी, विविध रेल्वे गाड्यांत बस छापे करण्यात आले

## १४ गाड्यांची तपासणी, एकाच दिवसात १.३० लाख रुपये वसूल



नांदेड, दि. २ (प्रतिनिधी) - दिनांक २८ जून २०२५ रोजी लिंबगाव हे बेस स्टेशन असल्याने मोठ्या प्रमाणात तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली, १४ रेल्वे गाड्यांची तपासणी करण्यात आली, या करिता बस छापे (बस रेड) करण्यात आले, तिकीट तपासणी मोहीम यशस्वीरित्या पार पडली. डॉ. विजय कृष्णा, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक/नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. एन. सुब्बा राव, सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक/खख/ नांदेड यांच्या देखरेखीखाली सकाळी ०५:०० ते संध्याकाळी ०६:०० वाजेपर्यंत ही छापेमारी करण्यात आली, ज्याचा उद्देश प्रमुख विभागांमध्ये तिकीटविरहित प्रवास आणि अनधिकृत विक्रेत्यांना आळा घालणे आहे.

या तिकीट तपासणी मोहिमे करिता ही टीम बसने लिंबगाव स्थानकावर पोहोचली आणि ही मोहीम तीन टप्प्यात राबवण्यात आली.

पहिला टप्पा: प्रवाशांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये धाक निर्माण करण्यासाठी १७६६३ तांडूर एक्सप्रेस, १७६८८ मराठवाडा एक्सप्रेस, १७६१२ राज्य राणी एक्सप्रेस, १७६१३ पनवेल एक्सप्रेस, ५७६५४ आदिलाबाद-परळी पॅसेंजर, ७७६५१ परळी-आदिलाबाद पॅसेंजर, १७०५७ देवगिरी एक्सप्रेस इत्यादी गाड्या थांबवून खालील गाड्यांवर अचानक तपासणी करण्यात आली.

**दुसरा टप्पा:** ही टीम दोन उप-टीममध्ये विभागली गेली: टीम 'अ' ने नांदेड-परभणी-पूर्णा सेक्शनवर गाड्यांची तपासणी केली: १७६१८ तपोवन एक्सप्रेस, १७६६२ नगरसोल-काचीगुडा एक्सप्रेस, १७६६१ काचीगुडा-नगरसोल एक्सप्रेस आणि टीम ब ने अकोला-हिंगोली-पूर्णा सेक्शनवर गाड्यांची तपासणी केली.

५७६५६ अकोला-पूर्णा पेसेंजर, १७६४२ नारखेर-काचीगुडा एक्सप्रेस. तिसरा टप्पा : संपूर्ण टीम बसमत (बीएमएफ) येथे गेली आणि बसमत-हिंगोली आणि अकोला-बसमत विभागांवर ५७६५५ आणि १२७१९ वर तपासणी केली. या धोरणात्मक तपासणीमुळे तिकीट नसलेल्या प्रवाशांमध्ये आणि अनधिकृत फेरीवाल्यांमध्ये, विशेषतः नांदेड-परभणी-पूर्णा-परळी-परभणी-अकोला विभागांमध्ये नैतिक भीती निर्माण झाली. या तिकीट तपासणी मोहिमेत श्री एन. सुब्बाराव यांच्या समवेत मुख्य तिकीट निरीक्षक / जनरल, ०३ कमर्शियल इन्स्पेक्टर, ०२ आरपीएफ कर्मचाऱ्यांसह एकूण २५ तिकीट तपासणी कर्मचारी मोहिमेत सहभागी झाले. तपासणीदरम्यान एकूण १४ गाड्या तपासण्यात आल्या.

तपासणीचा निकाल: ३३९ प्रवासी तिकीट नसलेले / अनियमित तिकिटवर प्रवास करताना आढळले, त्यांच्याकडून १,३०,६४० /- रुपये वसूल केले.

प्रवासी शिस्त सुनिश्चित करण्यात आणि महसूल वाढवण्यात ही मोहीम अत्यंत प्रभावी ठरली. नांदेड विभाग रेल्वे कामकाजाची अखंडता राखण्यासाठी आणि अधिकृत प्रवाशांना दर्जेदार सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे.

# देवाचे वस्त्र बनवण्याची निशु:ल्क स्पर्धा: विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम महिला विभागाचा स्तुत्य उपक्रम

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी)- महिलांच्या कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे व महीलांच्या सर्जनशीलतेला आणि कल्पनाशक्तीला वाव मिळावा या उद्देशाने विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या महिला विभागातर्फे महीलांसाठी 'देवाचे वस्त्र बनवण्याची निशुल्क स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने घराच्या देवघरातील 'देवीचे वस्त्र' 'श्रीकृष्णाचे, श्रीरामाचे, विठ्ठलाचे वस्त्र' ८ ते १२ इंच या आकारात बनवता येईल. यासाठी पारितोषके ठेवण्यात आली असून प्रथम क्रमांक रू.११०० द्वितीय क्रमांक रू.७५१ तृतीय क्रमांक रू.५५१ उतेजनार्थ - रू. २५१ असे त्याचे स्वरूप असेल.

वस्त्र स्वतः तयार करून व्यवस्थित पॅक करून आपले नाव आणि मोबाईल नंबर टाकून दिनांक १५-७-२०२५ पर्यंत सिडको-हडको परिसरातील महिलांनी माधुरी पाटील मो. ९४०४४८१६६० शहरांमधील महिलांनी कांचन तेलवाडकर मोबा. ७२६४०३३८५७ आणि सातारा परिसरामधील महिलांनी स्नेहल पांडव मोबा.९१५८२९६९९९ यांच्याकडे जमा करावेत. ही स्पर्धा वैयक्तिक महिलांसाठी आहे. वस्त्र तयार करणाऱ्या व्यावसायिकांसाठी नाही. वस्त्र स्वतः बनवलेले असावे रेडिमेड नाही तसेच वस्त्र तयार करतानाचे वेगवेगळ्या स्टेजचे तीन सेल्फी दिलेल्या संपर्क क्रमांकावर पाठवावेत असे आवाहन मंदिर आर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत महिला विश्वस्त संपर्कप्रमुख राजश्री भिते आणि संभाजीनगर जिल्हा महिला विश्वस्त संपर्कप्रमुख अनुराधा पुराणिक यांनी केले आहे.

# पुनर्रचित हवामान आधारित पेरू, लिंबू, चिकू व मोसंबी या फळपीकासाठी विमा योजनेत मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत पेरू, लिंबू, चिकू व मोसंबी या फळिपकांसाठी विमा काढण्याची अंतिम मुदत आता ८ दिवसांनी (०३ जुलै ते १० जुलै) वाढविण्यात आली आहे. यापूर्वी ही अंतिम मुदत ३० जून होती.

शासनाच्या १२ जून २०२४ च्या निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. ३० जून २०२४ पासून आधार संकेतस्थळाबाबत (पोर्टलबाबत) समस्या उद्भवल्याने शेतकऱ्यांना विमा अर्ज भरण्यात अडचणी येत होत्या. याची दखल घेऊन केंद्र शासनाने शेतकऱ्यांना दिलासा दिला असून, योजनेत सहभागी होण्यासाठी ०३ जुलै २०२४ ते १० जुलै २०२४ अशी ८ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी केंद्र शासनाच्या योजनेच्या संकेतस्थळ www.mfby.gov.in वर अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका लोकशाही दिन ७ जुलै रोजी

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी)- महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना कळिवण्यात येते की, महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो. माहे जुलै २०२५ चा '*महानगरपालिका लोकशाही दिन* सोमवार दि.०७ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रशासकीय समिती कक्ष,मनपा मुख्य कार्यालय येथे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारीत परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर दिनांक २१/०६/२०२५ पर्यंत विहीत नमुन्यात आवश्यक कागद पत्रासह अर्ज दिलेल्या नागरीकांनाच दि.०७ जून २०२५ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील, याची नोंद घ्यावी. ज्यांनी या पुर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणांत अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही असे उप आयुक्त तथा मुख्य समन्वयक लोकशाही दिन लखीचंद चव्हाण यांनी कळविले आहे.

# असोसिएशन ऑफ स्मॉल ॲण्ड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेची राज्य कार्यकारिणी जाहीर

## मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी आत्मलिंग शेटे यांची निवड

पुणे, दि, २ (प्रतिनिधी) - असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आप्पासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य संघटनेची राज्य कार्यकारिणी (२०२५-२६) जाहीर करण्यात आली. या राज्य कार्यकारणी मधील पदाधिकारी व सदस्य पुढील प्रमाणे.



राज्य उपाध्यक्ष- गोरख तावरे कराड सातारा, भिका तुकडू चौधरी जळगाव, राज्यसचिव-सुभाष लहाने बुलढाणा, राज्य संघटक-सुमित सुनीलराव कुलकर्णी श्रीरामपूर, महिला आघाडी प्रमुख-सौ तेजस्विनी सूर्यवंशी सांगली, संघटन सचिव-नेताजी मेश्राम गडचिरोली, सहसचिव-हेमंतू देसाई धमाबाद नांदेड, संघटन सहसचिव- भीमराव ऊल्हारे अहिल्यानगर, राज्य कार्यकारिणी सदस्य-सौ.सुमन लक्ष्मण वाकडे परळी वैजनाथ, भगवान नागोराव शहाणे छत्रपती संभाजीनगर, रवींद्र वाघ बुलढाणा, सौ शोभा जयपुरकर, नागपूर, ओम प्रकाश शिंदे, जालना, मराठवाडा विभागीय अध्यक्ष- छत्रपती संभाजीनगर : आत्मलिंग शेटे, परळी वैजनाथ, कोकण-अजित रामनाथ पाटील उरण जिल्हा रायगड, नागपूर-मुकुंद जोशी, गडचिरोली, नाशिक-विलास कट्यारे नाशिक, कोल्हापूर-सम्राट दिलीप सनगर, अमरावती-विजय देशमुख अकोला, लातूर-विठ्ठलराव भानुदास राव राऊत, जिल्हाध्यक्ष-छत्रपती संभाजीनगर मंगल ताई हिवाळे, जालना-अमित अनिल कुलकर्णी, बीड-दिगंबर माणिकराव सोळंके, हिंगोली-डॉक्टर प्रल्हाद शिंदे, नांदेड-माहेश्वरी कैलास गायकवाड, पुणे-महेश आनंदा लोंढे, सातारा-खंडू नागू इंगळे, सोलापूर-डॉक्टर सिद्राम आप्पा येलगरे, नाशिक-नंदलाल जगताप, अहिल्यानगर-जितेंद्र पितळे, जळगाव-धनंजय कीर्तने, नंदुरबार-चेतन सिंग राजपूत, धुळे-भालचंद्र पाटील, अमरावती-बडू कुमार धावणे, बुलढाणा-शौकत शहा घासी शहा, अकोला-आकाश नंदू कोकाटे, कोल्हापूर-विक्रम सिंह पवार, रायगड-आशिष अतुल पाटील, यवतमाळ-मनसुख भट्टी. याप्रमाणे राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महत्त्वाचे निर्णय एकत्रितपणे घेण्यासाठी एक कोअर कमिटी खालील प्रमाणे जाहीर करण्यात आली आहे.

१) आप्पासाहेब पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष, २) प्रवीण पाटील, राष्ट्रीय सचिव, ३) प्रदीप कुलकर्णी, राज्य अध्यक्ष

४) गोरख तावरे , राज्य उपाध्यक्ष, ५) भिका चौधरी, राज्य उपाध्यक्ष, ६) सुमित कुलकर्णी, राज्य संघटक, ७) सुभाष लहाने, राज्यसचिव.

या राज्य कार्यकारिणी मध्ये काही जिल्ह्यांचे जिल्हा अध्यक्ष तसेच पुणे व मुंबई या विभागांसाठीच्या विभागीय अध्यक्षांच्या निवडी बाकी आहेत. मान्यवर पदाधिकार्यांबरोबर चर्चा करून त्या त्या क्षेत्राचा दौरा करून लवकरच या निवडी घोषित केल्या जातील. तसेच विभागीय अध्यक्षांनी आपल्या जिल्ह्यातील काही जिल्हाध्यक्षांची निवड होणे बाकी असेल तर त्या नावाची त्वरित शिफारस करणे गरजेचे आहे. जिल्हा अध्यक्षांना याद्वारे सुचित करण्यात येते की त्यांनी आपल्या जिल्ह्यातील जिल्हा कार्यकारिणी तयार करून त्याबाबतची सूचना त्वरित राज्याध्यक्ष यांना देणे गरजेचे आहे. आपल्या संघटनेसाठी सोशल मीडियाचा वापर खूप महत्त्वाचा आहे.

तेव्हा प्रत्येक जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व सभासदांचा एक व्हाट्सअप ग्रुप तयार करून त्यामध्ये मान्यवर पदाधिकार्यांचा समावेश करावा म्हणजे एकमेकांच्या संपर्कासाठी या ग्रुपचा नक्कीच फायदा होऊ शकतो. विभागीय अध्यक्षांनी विभागीय कमिट्यांची निवड आपल्या स्तरावर करणे गरजेचे आहे आणि अशी निवड करून त्यांनी राज्य अध्यक्ष यांना कळवणे आवश्यक आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मध्यप्रदेशच्या मजुरांची क्रूरता; मंदिरातील चोरीला विरोध केल्याने महिला कीर्तनकाराची हत्या

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- कीर्तनकार सुनीता अण्णासाहेब पवार महाराज यांच्या निर्घृण हत्येचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. या हत्येप्रकरणी मूळच्या मध्यप्रदेशातील दोन मजुरांना छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. संतोष उर्फ भायला चौहान आणि अनिल उर्फ हाबडा विलाला अशी आरोपींची नावे आहेत. चोरी करताना विरोध केल्याने कीर्तनकार पवार यांची हत्या केल्याची कबुली त्यांनी दिली.

२७ जून रोजी रात्री चोरट्यांनी मंदिराचे कुलूप तोडून दानपेटी, मूर्त्या व इतर साहित्य चोरी केल्यानंतर झोपलेल्या कीर्तनकार सुनीता पवार यांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केला होता. याप्रकरणी त्यांच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून विरगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेला १ जुलै रोजी गोपनीय माहिती मिळाली. महालगाव शिवारातील गणेश भेळ सेंटर परिसरात एक संशयित व्यक्ती फिरत असल्याचे समजल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याचे नाव संतोष उर्फ भायला चौहान (रा. अंछली, ता. सेंधवा, जि. बडवाणी, मध्यप्रदेश) असे असल्याचे निष्पन्न झाले. त्याने साथीदार अनिल उर्फ हावडा विलाला याच्यासोबत मिळून मंदिरात चोरीसाठी आले असताना कीर्तनकार सुनीता पवार यांचा खून केल्याची कबुली दिली. अनिल हा घटनेनंतर गावी पळून गेला होता. त्याला शोधण्यासाठी पोलिसांनी मध्यप्रदेशमध्ये पाठवलेल्या पथकाने शिरपूर सीमेवरून त्याला अटक केली. चौकशीत त्यानेही गुन्ह्याची कबुली दिली.

ही कारवाई ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार मे. राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, पोनि विजयसिंह राजपूत, सपोनि शंकर वाघमोडे व स्थानिक गुन्हे शाखा व पोलिस ठाणे विरगाव यांनी केली.

मध्यप्रदेश येथून मजुरीसाठी आलेले संतोष चौहान आणि अनिल विलाला हे मंदिर परिसरात मागील वर्षभरापासून राहत होते. दोघांच्या नजरेत मंदिर आले. येथे भरपूर पैसे आणि दागिने मिळतील या उद्देशाने दोघांनी मंदिरात प्रवेश केला. कीर्तनकार सुनीता पवार यांना चोरांची चाहूल लागली. त्यांनी विरोध केल्याने त्यांचा दोघांनी खून केल्याचे स्पष्ट केले. दोन्ही आरोपींविरुद्ध भादंवि कलम १०३, ३०५, ३३१ (८), ३३१ (४) अंतर्गत गुन्हा दाखल असून, त्यांना पुढील तपासासाठी विरगाव पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

# आणीबाणीतील तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांचा सन्मान



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या काळात जिल्ह्यातील ज्या नागरिकांनी तुरुंगवास भोगला व भुमिगत राहून कार्य केले अशा नागरिकांचा सन्मान आज अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन च्या संगीता राठोड, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शाल, सन्मानपत्र आणि गुलाब पुष्प देऊन सर्वांना सन्मानित करण्यात आले. जिल्हा नियोजन सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

आपला देश हा लोकशाही देश आहे. १९७५ ला देशात आणीबाणी लागली यावेळी अनेक नागरिकांना तुरुंगास भोगावा लागला. लोकशाहीचे महत्त्व अबाधित राखण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. अनेकांनी भुमिगत राहून कार्य केले. या सर्व सहभागी नागरिकांना शासनातर्फे मानधन देण्यात येते. या आणीबाणीत सहभाग घेतलेल्या व्यक्तींप्रती सन्मान म्हणून प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान करण्याचे निर्देश शासनाने दिले होते. त्या अनुषंगाने या स्वातंत्र्य सैनिक व नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

# जैनांचे २२ वे तिर्थंकर भगवान नेमीनाथ यांचा मोक्ष कल्याणक निर्वाण लाडु राजाबजार जैन मंदिरात उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर येथे २०२५ चातुर्मास निमीत्त आचार्य प्रणामसागरजी महाराज वास्तव्यास असुन त्यांच्या सानिध्यात विविध धार्मिक कार्यकमाचे आयोजन करण्यात आले असुन आज जैनांचे २२ वे तिर्थंकर भगवान नेमीनाथ यांचा मोक्ष कल्याणक निमीत्त आज सकाळी भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. तदनंतर निर्वाण कांडचे वाचन करुन भगवंताला दिलीपकुमार रोहितकुमार पाटणी परिवाराच्या वतीने निर्वाण लाडु चढविण्यात आला. यावेळी शांतीमंत्राचे पठण आचार्य प्रणामसागरजी महाराज यांनी केले. तदनंतर आचार्यश्रींनी नेमीनाथ भगवंतावर आपले उदबोधन केले. यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा, चंदा कासलीवाल, संतोष सेठी महावीर ठोले , किरण पहाडे, निता ठोले, ललीत पाटणी, अशोक गगवाल प्रमोद पाडे अनुप पाटनी वर्धमान पांडे, अनिला ठोले, ताराबाई कासलीवाल, बापु कासलीवाल, समिर ठोले, सुरेखा पाटणी, सुनिता पाटणी, जयश्री गंगवाल, निर्मल पांडे, भिकचंद लोहाडे, सतिश ठोले, प्रकाश कासलीवाल, शांतीलाल पाटणी, शिरीष पाटणी, रविंद्र सेठी, डॉ.शैलेश चांदीवाल, महावीर काला, कांताबाई पहाडे, राजाभाऊ पहाडे, रिना ठोले,सपना पापडीवाल, भरत पापडीवाल यांच्यासह समाज बांधवांची मोठी उपस्थिती होती तसेच दिनांक ३ जुलै ते १० जुलै पर्यत श्री.हिराचंद कस्तुरचंद कासलीवाल प्रांगण येथे आचार्य प्रणामसागरजी महाराज यांच्या ससंघ सानिध्यात संगीतमय अष्टानिका पर्वा निमीत्त सिध्द चक्र महाआर्चना महोस्तवाचे आयोजन करण्यात आले असुन यावेळी सौधर्म इंद्र म्हणुन सौ.संगीता विजयकुमार सेठी, कुबेर इंद्र म्हणुन सौ.वंदना विनोदकुमार कासलीवाल, यज्ञ नायक म्हणुन सौ.हेमलता इंदरचंद चुडीवाल, ईशान इंद्र म्हणुन सौ.सरीता रविंद्र कासलीवाल, सनदकुमार इंद्र म्हणुन सौ.अलका विलास कासलीवाल, महेंद्र इंद्र म्हणुन सौ.प्रतिभा जयचंद प्रितम नितीन कासलीवाल परिवार हे लाभले आहे. तसेच श्रीफळसाठी विजयकुमार जितेंद्रकुमार नविनकुमार नितीनकुमार पाटणी परिवार यांचे योगदान मिळाले आहे.

संपुर्ण कार्यकम हा हिराकाका प्रांगण आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव सभागृह नवाबपुरा येथे होणार आहे. तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन खंडेलवाल दिंगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार अंतर्गत श्री.भक्तांबर प्रभावना चातुर्मास समिती २०२५ यांनी केली आहे.

अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

# आज पडेगाव ते मिटमिटा रोडवर कारवाई



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- उद्या पडेगाव ते मिटमिटा या रोडवर सेंटर पासून दोन्ही बाजूने ३० मीटरच्या अंतरापर्यंत मार्किंग करण्यात आली असून उद्यापासून अतिक्रमण निर्मूलन कारवाई ची सुरुवात होणार आहे.

या रस्त्यावर मार्किंग झाली असून उद्या सकाळी ०८ वाजेपासून अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई होणार आहे, अशी माहिती नियंत्रण अधिकारी अतिक्रमण विभाग संतोष वाहूळे यांनी दिली आहे. दिनांक ३ जून पासून प्रमुख रस्त्यांवरील सर्विस रोडच्या जागेवर अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात आलेली आहे.

आतापर्यंत सदरील कारवाईत देवळाई चौक ते महानुभाव आश्रम, केंब्रिज नाका ते मुकुंदवाडी आणि महानुभाव आश्रम ते नक्षत्रवाडीत महानगरपालिकेची हद्दीपर्यंत कारवाई करण्यात आली आहे. वर नमूद सर्विस रोड दोन्ही बाजूने ३० मीटर रुंदीचे आहे. पडेगाव ते मिटमिटा रोडची मार्किंग झाली असून उद्यापासून या रोडवर देखील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम निर्मूलनाचे कारवाईची मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

## छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षणासाठी सोडत दि.७ जुलैला जाहीर

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार, छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील एकूण १५५ ग्रामपंचायतींमधील सरपंच पदांचे आरक्षण सोडत दि. ७ जुलै सोमवार रोजी तहसील कार्यालयातील सभागृहात सकाळी ११:०० वाजता जाहीर होणार आहे.

एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी महिलांसाठी सरपंच पदांचे आरक्षण निश्चित केले जाणार आहे.

सरपंच पदाचे आरक्षण काढण्यासाठी व ठरविलेल्या वेळेत सभागृहामध्ये नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## फळपिक विमा योजनेस अर्ज करण्यासाठी चार दिवसांची मुदतवाढ- कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

मुंबइ दि.२ (प्रतिनिधी)- हवामान आधारित फळपिक विमा योजनेच्या मर्यादित कालावधीत केंद्र सरकारने मुदतवाढ करून राज्यातील फळपिक शेतकऱ्यांना दिलासा दिल्याची माहिती कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या योग्य समन्वयामुळे पिक विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना आता ६ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करता येणार असल्याचे कृषिमंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले.

हवामान आधारित फळपिक विमा योजनेंतर्गत मृग बहार २०२५ मध्ये द्राक्ष, पेरू, लिंबू, संत्रा, चिकू, मोसंबी या पिकांसाठी विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम दिनांक ३० जून २०२५ होती, मात्र २७ जून २०२५ पासून आधार संकेतस्थळाबाबत समस्या असल्याने विमा अर्ज करण्यामध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी शेतकरी बांधवांकडून येत होत्या. याबाबत केंद्र सरकारशी योग्यवेळी समन्वय साधल्याने एकूणच परिस्थितीचा विचार करून दिनांक ३ ते ६ जुलै २०२५ असे एकूण चार दिवस वरील पिकांकरिता फळपिक विमा योजनेत भाग घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी केंद्र शासनाच्या **www.pmfby.gov.in** या संकेतस्थळाला भेट देऊन विमा योजनेचा अर्ज करावा, असे आवाहन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले आहे.

## ‘रमाई आवास’मध्ये बनावट लाभार्थी, सर्वेक्षणात नेत्यांनी केला गैरव्यवहार, माजी खासदार इम्तियाज जलील यांचा आरोप

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- मनपामार्फत राबवण्यात येणाऱ्या रमाई आवास योजनेत गरजूंना डावलून बनावट लाभार्थींच्या नावाने निधी वाटप केले. लाभार्थींच्या सर्वेक्षणासाठी नेमण्यात आलेली एजन्सी याच समाजातील नेत्यांनी तब्बल ९० टक्के कमी दराने घेत कोट्यवधींचा आर्थिक गैरव्यवहार केला, असा आरोप माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला. याबाबत त्यांनी मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील यांच्याशी इम्तियाज यांनी चर्चा केली.

सरकारमार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी शहरांमध्ये स्वयंचलित पक्के घरे उभारण्यासाठी रमाई आवास योजना राबवली जाते. योजनेंतर्गत ३२५ चौरस फुटांच्या घरकुलासाठी अडीच लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले जाते. या योजनेत बनावट लाभार्थींची नावे समाविष्ट करून, मूळ गरजूंना डावलले. काही ठिकाणी प्रत्येक योजनेतील लाभासाठी दीड लाख रुपये स्वतःकडे ठेवून केवळ एक लाख रुपयांचा लाभ मूळ लाभार्थींना दिला जात आहे, असे इम्तियाज जलील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

गरजूंना लाभ न मिळता, राजकीय हस्तक्षेप किंवा दलालांमार्फत बनावट लाभार्थींना लाभ देण्याचे प्रकार घडत असल्याचा संशय निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, प्राप्त अर्जांची शहानिशा करून खऱ्या अर्थाने गरजूंना थेट लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने विशेष चौकशी समिती स्थापन करावी, अशी मागणी इम्तियाज यांनी केली.

## खासगी दुचाकींना बाईक टॅक्सी सेवा देण्यास केंद्र सरकारची परवानगी

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- देशात प्रथमच केंद्र सरकारने खासगी वापरासाठी नोंदणीकृत दुचाकींना राईड-हेलिंग ॲग्रीगेटर प्लॅटफॉर्मवर बाईक टॅक्सी सेवा देण्याची परवानगी दिली आहे. यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने ‘मोटार वाहन ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५’ अधिसूचित केली असून, प्रत्यक्ष अंमल बजावणीसाठी संबंधित राज्य सरकारांची मान्यता आवश्यक राहणार आहे. या निर्णयामुळे ओला, उबर, रॅपिडोसारख्या सेवा देणाऱ्या कंपन्यांना कायदेशीर मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

(पान १ वरुन)

### शक्तीपीठ महामार्गासाठी...

मालाला दीडपट भाव देऊ असे आश्वासन दिले होते. निवडणुकीआधी कर्जमाफी करू अशी घोषणा केली होती. आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी समिती नको अशी भूमिका विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडली.

शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी सरकार २० हजार कोटी मंजूर करतात पण शेतकरी कर्जमाफी साठी पैसे नाहीत का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे. नांगराला बैल जुंपण्याचा खर्च परवडत नाही म्हणून लातूरमधील एका ६५ वर्षीय अंबादास पवार या शेतकऱ्याने बैलांऐवजी स्वतःला नांगराला जुंपलं. त्यामुळे सर्व कामकाज बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. अध्यक्षांनी स्थगन प्रस्ताव फेटाळल्या-मुळे विरोधक आक्रमक झाले, शेतकरी प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे, चर्चा टाळत असल्याने सरकारचा निषेध करत विरोधकांनी सभागृहाचा बहिष्कार केला.

शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलंच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करीत विरोधी पक्ष सदस्यांना सभागृहात गोंधळ न घालण्याचे आवाहन केले.

### शक्तीपीठ महामार्ग विरोधात...

ठेवत खासदार विशाल पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सांगली ग्रामीण पोलिसांनी खासदार विशाल पाटील यांच्यासह ५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केलाय. शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागणीसाठी खासदार विशाल पाटील यांच्यासह शक्तिपीठ महामार्ग कृती समिती आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी सांगलीतील अंकली येथे रास्ता रोको आंदोलन केलं होतं. या आंदोलनामुळे सांगली ते कोल्हापूर महामार्ग आणि रत्नागिरी ते नागपूर राष्ट्रीय महामार्ग ठप्प झाला होता. सांगली जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी २० जून रोजी बंदी आदेश लागू केला होता. मात्र, बंदी आदेशाचे उल्लंघन करत सांगलीचे खासदार विशाल पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांच्यासह शेतकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करून तासभर वाहतूक रोखली होती. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांचा आदेशाचा भंग केल्याचा ठपका ठेवत सांगली ग्रामीण पोलिसांनी खासदार विशाल पाटील यांच्यासह ५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### उद्धव ठाकरेंच्या याचिकेवर...

खंडपीठाने हे प्रकरण अंशिक कामकाजाच्या दिवसांमध्ये सुनावणी घेण्यास नकार दिला. दरम्यान शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्या वकिलांनी असे म्हटले की, ७ मे रोजी न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या खंडपीठाने अशी प्रकारची तातडीने सुनावणी घेण्याची विनंती फेटाळून लावली होती.

मात्र यावर कामत म्हणाले की न्यायमूर्ती कांत यांच्या खंडपीठाने प्रकरण सुट्टयांमध्ये मांडण्याची परवानगी दिली आहे.

### पंढरीच्या वारीत अर्बन...

भेटल्या आणि आम्ही देखील सांगितलं ही या गोष्टीला आळा घाला. सन २०१०, २०११ पासून ह्या लोकांवर गुन्हे नोंद आहेत. जामिनावर असलेले लोकं देखील यात आहेत, अंधश्रद्धा निर्मुलनाच्या नावाखाली हे सर्व सुरू आहे, असा आरोप करत कायंदे यांनी अंनिसकडे बोट दाखवले आहे. वारीला बदनाम करण्याचा प्रयत्न होतोय, मुख्यमंत्र्यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. वारीचा गैरफायदा घेऊ नये हाच उद्देश आहे. महिला संविधानाचे पुस्तक घेऊन आम्ही चालतात, संविधानाच्या नावाखाली फेक नॅरोटिव्ह पसरवणारी ही लोकं तेच तर नाहीत ना, असा सवालही कायंदे यांनी विचारला आहे.

### नॅशनल हेराल्ड प्रकरणी...

लॉंड्रिंग प्रकरणात ईडीच्या फिर्यादी तक्रारीची दखल घ्यावी की नाही, याबाबत न्यायालयात युक्तिवाद सुरू आहे.

सुनावणीदरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी असेही म्हटले की, गांधी कुटुंबाच्या जवळच्या सहकाऱ्यांना एजेएलचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले होते आणि पैसे वळवण्यासाठी फसवे व्यवहार केले गेले.

नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला दिलेले ९० कोटींचे कर्ज फक्त ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात यंग इंडियनला हस्तांतरित केल्याचा गंभीर आरोप आहे. या इक्विटी व्यवहारामुळे २००० कोटी रुपयांच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचे ईडीचे म्हणणे आहे.

### अपाचे लढाऊ हेलिकॉप्टर्सची...

झालेल्या ६०० दशलक्ष डॉलर्सच्या कराराचा भाग म्हणून, भारतीय लष्कराला मे-जून २०२४ पर्यंत सहा अपाचे हेलिकॉप्टरची डिलिव्हरी अपेक्षित होती. पण, पुरवठा साखळीत व्यत्यय आल्यामुळे ही डिलिव्हरी डिसेंबर २०२४ पर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

याबाबतची माहिती असलेल्या सूत्रांनी असे सांगितले की, या हेलिकॉप्टरची पहिली तुकडी या महिन्यापर्यंत भारतीय लष्कराच्या एव्हिएशन कॉर्प्सला सुपूर्त केली जाऊ शकते. याबाबत इंडिया टुडेने वृत्त दिले आहे.

### अनिल परब लिंबू मिरची घेऊन...

दिली. आपण लाडक्या बहिणींना १५०० रुपये देऊन मजबूत स्थान दिले, शेतकऱ्यांना न्याय दिला, पण आज माझा विषय आहे, तुम्ही एवढ्या लाडक्या बहिणींचा मान सन्मान करताय, एवढा मानसन्मान करताना माझे देखील एक कर्तव्य आहे की, महाराष्ट्राच्या प्रत्येक बहिणीची सुरक्षा राहण्यासाठी माझे योगदान काय? हा प्रश्न माझ्यासमोर आहे. मी माझ्या बहिणीची सुरक्षा राखण्यासाठी काय करु शकतो? असा मला प्रश्न पडतो, असे अनिल परब म्हणाले.

### अल्पवयीन विद्यार्थ्याशी...

उघडपणे बोलून दाखवली. मात्र, तरीही हे कुटुंब गप्प राहिले. इयत्ता १० वीचे वर्षे संपायला काहीच महिने शिल्लक असल्याने कुटुंबीयांनी ही बाब लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला. शाळेतून बाहेर पडल्यानंतर तरी संबंधित शिक्षिका आपल्या मुलाचा पाठलाग थांबवेल, असा त्यांचा अंदाज होता. मात्र, १० वी बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतरही ती शिक्षिका त्याला सोडत नव्हती. शिक्षिकेने घरकाम करणाऱ्या महिलेच्या माध्यमातून पुन्हा त्या मुलाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा हे प्रकरण पुन्हा वाढले. शिक्षिकेने, भेटायचे आहे असा मेसेज मुलासाठी पाठवला. त्यानंतर, ’कुटुंबाने आमच्याकडे येऊन गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला,’ अशी माहिती पोलिसांनी दिली.

### अल्पवयीन मुलीचा हात पकडून...

(पाठलाग करुन विनयभंग) तसेच पोक्सो कायद्यांतर्गत दोषी मानलं. सत्र न्यायालयाच्या या निर्णयाला त्या व्यक्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिलं.

या प्रकरणी आपल्यावर सूडबुद्धीतून गुन्हा नोंदवण्यात आला असून त्या घटनेचा कोणीही साक्षीदार नाही. तसेच आपण त्या मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केला असल्याचा कोणताही पुरावा नाही असा दावा त्या व्यक्तीकडून करण्यात आला. या सर्व गोष्टी लक्षात घेता न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या एकल खंडपीठाने यावर सुनावणी केली आणि त्या व्यक्तीची निर्दोष मुक्तता केली. केवळ मुलीचा हात पकडून आय लव्ह यू म्हटल्याने लैंगिक अत्याचार होत नाही असं निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवलं.